महापालिका सहाय्यक आयुक्त
बिबवेवाडी कार्यालय, पुणे महानगरपालिका
उत्सव इमारत,शिवनेरी पथ,बिबवेवाडी,पुणे-३७
Email - asakpal@punecorporation.org
दुरध्वनी क्र. - 020-25508700
जा.क्र. ८८९८ दि.- ०७/०३/२०२४

## अपिलाची सुनावणी

अपिलीय अधिकारी तथा महापालिका सहाय्यक आयुक्त, बिबवेवाडी कार्यालय, पुणे महानगरपालिका यांच्या प्राधिकरणासमोरील कामकाज.)

दिनांक – ०४ / ०३ /२०२४ दिनांक – दुपारी १२ .३० वा.

स्थळ - महापालिका सहाय्यक आयुक्त, बिबवेवाडी कार्यालय, पुणे महानगरपालिका, उत्सव इमारत, शिवनेरी पथ, बिबवेवाडी, पुणे ४११०३७.

प्रति,

**श्री. डॉ. अजित ताम्हनकर**
**पुष्कराज ए /६. शाहू सोसायटी**
**नातु बाग सातारारोड**
**पुणे – ४११०३७** } अपिलार्थी

श्री जयदीप अडसूळ
महापालिका सहाय्यक आयुक्त
बिबवेवाडी कार्यालय,
पुणे महानगरपालिका. } जनमाहिती अधिकारी तथा उप अभियंता विद्युत विभाग

**माहिती अधिकार अधिनियम २००५ चे कलम १९ (१) अन्वये अपिल**

श्री विष्णू नारायण मोरे माहिती अधिकारातीलयांचा मा (यापुढे अपिलार्थी म्हणून संबोधिले जातील) २३ /०१ /२०२४ रोजीचा अर्ज जन माहिती अधिकारी तथा उप अभियंता विभाग, महापालिका सहाय्यक आयुक्त, बिबवेवाडी कार्यालय, पुणे महानगरपालिका आ. क्र.१००९७ दि. २३ /०१ /२०२४ यांना दिनांक ( यापुढे जन माहिती अधिकारी म्हणून संबोधिले जातील) रोजी प्राप्त झाला.

**माहिती अधिकारातील अर्जाचा तपशील**

| अर्जाचा दिनांक | अर्ज प्राप्त झाल्याचा दिनांक | माहिती द्यावयाचा अंतिम दिनांक | अर्जदारास माहिती पाठविल्याचा दिनांक | विलंब दिवस |
|---|---|---|---|---|
| १५ /१२ /२०२३ | आ क्र ८७९३<br>१५ /१२ /२०२३ | १४ /०१ /२०२३ | जा क्र – ७३३०<br>१२ /०१ /२०२३ | - |

अपिलार्थी यांनी विचारलेली माहिती अद्याप आवश्यक माहिती मिळाली नाही त्यामुळे अपीलार्थी त्यांचा अपिल अर्ज दिनांक २३/०१/२०२४ रोजी अपिल अधिकारी तथा महापालिका सहाय्यक आयुक्त, बिबवेवाडी कार्यालय, पुणे महानगरपालिका यांचेकडे प्राप्तझाला.

**अपिल अर्जाचा तपशील**

| अपिल अर्जाचा दिनांक | अपिल अर्ज प्राप्त झाल्याचा दिनांक | अपिल दाखल करावयाचा अंतिम दिनांक |
|---|---|---|
| २३ /०१/२०२४ | २३ /०१ /२०२४ | अपिल अर्ज मुदतीत आहे |

प्रथम अपिल सुनावणी दिनांक व वेळ - दि. ०४ /०३ /२०२४ रोजी दुपारी १२. ३० वा.
सुनावणीस अपिलकर्ता - उपस्थित
सुनावणीस जनमाहिती अधिकारी - उपस्थित
सुनावणीस सहा.जनमाहिती अधिकारी - उपस्थित

जनमाहिती अधिकाऱ्याने अपिलार्थीस दिलेल्या उत्तराचा/माहितीचा तपशील –

| .क्र. | माहितीचे वर्णन | तपशील |
|---|---|---|
| १ | खांब हलविणे विद्युत कामाशी संबधित व्यक्तीचे नाव व हुद्दा द्यावा. | कनिष्ठ अभियंता श्री सागर कांबळे व उप अभियंता श्री जयदीप अडसूळ . |
| २ | संबधित व्यक्तीस मूळ अर्ज व स्मरण पत्र दिल्याची तारीख द्यावी. | संदर्भ क्र २ च्या पत्रान्वये आपण शाहू सोसायटी समोरील स्ट्रीट लाईट पोल शिफ्ट करण्याबाबत सुचविले आहे. तसेच संदर्भ क्र ३ च्या पत्रामध्ये तोच स्ट्रीट लाईट पोल काढण्याबाबत अर्ज केला आहे. आपण केलेल्या संदर्भ २ व ३ च्या पत्रान्वये कनिष्ठ अभियंता व उप अभियंता यांनी प्रत्येक्ष जागेवरती पहाणी केली असता शाहू सोसायटी समोरील स्ट्रीट लाईट पोल शिफ्ट केल्यास किवा पूर्ण पणे काढल्यास शाहू सोसायटी समोर / शेजारी तसेच रस्त्यावरती प्रकाश व्यवस्था कमी / अंधार होणार आहे . त्यामुळे सदरचा पोल शिफ्ट करणे किवा काढणे योग्य होणार नाही. |
| ३ | संबधित व्यक्तीने कामाविषयी केलेली टीपण / प्रस्ताव / नियोजन याची माहिती द्यावी | |

**विवेचन**

अपिलार्थी यांचे वरील अपिल अर्जावर दिनांक २७/०२/२०२४ रोजी दुपारी १२.३० वाजता सुनावणी आयोजित करण्यात आली होती. सदर सुनावणीस अपिलार्थी श्री डॉ अजित ताम्हणकर उपस्थित होते. सदर दिनांकास श्री जयदीप अडसूळ जन माहिती अधिकारी तथा उप अभियंता विद्युत विभाग बिबवेवाडी कार्यालय, पुणे महानगरपालिका हे उपस्थित होते. तसेच श्री सागर कांबळे सहा जनमाहिती अधिकारी तथा कनिष्ठ अभियंता बिबवेवाडी कार्यालय, उपस्थित होते.

अपिलार्थी श्री डॉ अजित ताम्हणकर यांनी माहिती अधिकार अधिनियम २००५ अन्वयेच्या त्यांच्या अर्जात विचारलेली माहिती अपिलार्थी यांना मुदतीत मिळाली नाही. त्यामुळे अपिल अर्ज दाखल केला असल्याचे विवेचनात नमूद केले आहे. त्यानुसार जनमाहिती अधिकारी यांनी त्यानुसार मी, अपिलीय अधिकारी तथा महापालिका सहाय्यक आयुक्त, बिबवेवाडी कार्यालय, पुणे महानगरपालिका प्रस्तुत प्रकरणी खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

<u>**अपिल अधिकारी यांनी सदर सुनावणीमध्ये केलेले आदेश'**</u>

पुढील प्रमाणे पारित आदेशानुसार,जनमाहिती अधिकारी व सहाय्यक जनमाहिती अधिकार यांचे म्हणणे ऐकून घेतल्यानंतर जनमाहिती अधिकारी यांना असा प्रकार या पुढे होणार नाही याची सक्त ताकीद देण्यात आलेली आहे. सबब सदर अपिल निकाली काढण्यात येत आहे.

( प्रदीप आव्हाड )
**अपिलीय अधिकारी** तथा
**महापालिका सहाय्यक आयुक्त**
बिबवेवाडी कार्यालय
पुणे महानगपालिका

<u>टिप –</u>

सदर माहितीने अपिलार्थी यांचे समाधान न झाल्यास ९० दिवसाच्या आत मा.आयुक्त, राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ, पुणे, नवीन प्रशासकीय इमारत, ४ था मजला, पुणे-४११००१ यांचेकडे व्दितीय अपिल करण्याबाबत माहिती अधिकार अधिनियम २००५ नुसार तरतूद आहे. प्रथम अपील सुनावणी आदेशाची प्रत www.punecorporation.orgया संकेतस्थळावर उपलब्ध करून देण्यात येईल.प्रत -

१. श्री जयदीप अडसूळ ,जनमाहिती अधिकारी तथा उप अभियंता विद्युत विभाग बिबवेवाडी कार्यालय, पुणे महानगरपालिका
२. श्री सागर कांबळे सहा जनमाहिती अधिकारी तथा कनिष्ठ अभियंता विद्युत विभाग बिबवेवाडी कार्यालय, पुणे महानगरपालिका